**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-००००03-२०१५**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १/२०१५</u>**

**<u>निशाणी क्र. ३११ वरील आदेश</u>**

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र.३ सुमित्रा नथुराम तिर्लोटकर यांचे दि.०२/११/२०२३ रोजी तिर्लोट, ता.देवगड येथे निधन झालेले आहे. सदर प्रतिवादी क्र.३ ही वादीची वंशावळीतील नसल्यामुळे तिच्या निधनाबाबत वादीस माहीती नव्हती. सदर दाव्याचे कामी प्रतिवादीतर्फे न्यायालयात पुरशीस दाखल करण्यात आली. त्यावेळी वादीस सदर प्रतिवादी मयत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तिचे वारसांबाबत माहिती घेऊन वादी आता तिचे वारस दाखल करत आहेत. सदर विलंबामुळे प्रतिवादी क्र.३ विरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. त्यामुळे सदरचा आदेश रद्द होणेसाठी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर अर्जातील कारणे बेकायदेशीर व खोटी आहेत. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.३१५ च्या यादी सोबत मयत प्रतिवादी क्र.३ चे मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ३ या दिनांक ०२/११/२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. निधनाबाबत वादीस अलिकडेपर्यंत काहीही माहिती नव्हती नाही हे कारण स्विकाराहे नाही. प्रस्तुतचा दावा हा ठरावासाठी व कायम ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश

पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादींना रक्कम रुपये २००/– देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.३ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.10.10 14:44:55 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः ०९/१०/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.